# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.01.2026** **वार:शनिवार**

1. मायमराठीच्या अस्तित्वाची लढाई प्रत्येकाच्या उंबरठ्यावर-साहित्य संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांचं प्रतिपादन
2. महापालिका निवडणुकीत अर्ज माघारीनंतर काही उमेदवार बिनविरोध विजयी; आज चिन्हांचं वाटप
3. देशात यंदा सुमारे साडेतीनशे लाख टन साखरेचं उत्पादन होण्याचा अंदाज आणि
4. विज्ञान परिषदेचे जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**<u>साहित्य संमेलन</u>**

सातारा इथं 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन काल ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळत्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील, स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुलांना मराठी शाळेतच पाठवा अशी आग्रही भूमिका संमेलनाध्यक्ष, विश्वास पाटील यांनी उद्घाटनप्रसंगी मांडली. शेतकरी मातांचा गौरव, 'लढाऊ धरतीमाता' योजना, माफक दरातील पुस्तकविक्री, ग्रंथालयं आणि मराठी शाळा टिकवण्यासाठी सर्वस्तरावर प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. मायमराठीच्या अस्तित्वासाठी जागृत होण्याचं आवाहन करताना ते म्हणाले....

**आज अगदी खरं सांगायचं तर एकूणच माय मराठीच्या अस्तित्वाची लढाई आपल्या प्रत्येकाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचलेली आहे. उद्या तुमच्या देवाऱ्यावर विठोबा संवेत ज्ञानेश्वर आणि तुकारामाच्या प्रतिमा टिकाव्यात असे तुम्हाला वाटत असेल तर बंधूंनो वेळेत जागे व्हा तुमच्या खांद्यावर झेंडा कोणत्याही जातीचा असो पक्षाचा असो धर्माचा असो त्याचा दांडा मराठी असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असू दे त्या पालखीचा गोंडा मराठी असायला हवा.**

उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांनी दलित साहित्याला भारतीय साहित्याची मोठी क्रांती असल्याचं सांगितलं. दलित साहित्याची सुरुवात मराठीतूनच झाली असून इतर भाषांना त्यातून प्रेरणा मिळाल्याचं त्या म्हणाल्या. मराठी साहित्याची बहुभाषक समृद्ध परंपरा सर्व लेखकांसाठी प्रेरणादायी असल्याचंही नमूद करताना त्यांनी मराठी साहित्य आणि नाटकांबद्दल गौरवोद्गार काढले. त्या म्हणाल्या.....

**मराठी साहित्य धारा में जिस तरह नाटकों का हिस्सा रहा है, भाग रहा है, जिस तरह नाटक लिखे और खेले गए हैं, उस तरह के उच्च कोटि के नाटक हिंदी में नहीं है और हिंदी में हम शायद थोड़ासा मराठी से इस मामले में पीछे है। सबसे पहले तो खैर विजय तेंदुलकर के उपन्यास शांतता कोर्ट चालू आहे और सखाराम बाइंडर मैंने पढ़ा और देखा, मैं बराबर नाटक देखती रही पढ़ती रही।**

महाराष्ट्रात सक्ती फक्त मराठी भाषेचीच राहील, असं स्पष्ट प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना केलं. मराठी भाषा मूल्यांची असून विचारांच्या प्रवाहातून प्रगल्भता येण्यास मदत होते आणि त्यामुळं जाणीवा समृद्ध होतात असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले.....

**विचारांची जी काही आपली संस्कृती आहे ती त्या एका नदी सारखी आहे की, ज्याच्यामध्ये खूप विविध प्रकारचे विचार अनेक वेळा एकमेकाला परस्पर विरोधी अशा प्रकारचे विचार देखील हे व्यक्त होत असतात. पण या सगळ्या विचाराच्या मंथनातून एक नदीचा असा प्रवाह तयार होतो की, जो संस्कृती म्हणून साहित्य म्हणून आपल्या जाणीवा समृद्ध करतो, जो साहित्य आणि संस्कृती म्हणून आपल्या विचारांना प्रगल्भ करतो आणि म्हणूनच मला असं वाटतं की ही जी परंपरा आपल्या मराठी साहित्याने साहित्य संमेलनाने मराठी भाषेने मराठी भाषेतल्या सारस्वतांनी जपलेली आहे, ती अत्यंत महत्त्वाची आहे.**

मावळत्या अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांनी प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांवर इतर भाषांची सक्ती करू नये, असा सल्ला दिला. मराठी भाषेची समृद्धी विविध समाजघटकांच्या लेखनातूनच होईल, असा विश्वासही भवाळकर यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी थोरल्या शाहू महाराजांची स्मारकं, चरित्र, दूरचित्रवाणी मालिका, साताऱ्यात विद्यापीठ उपकेंद्र आणि आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवाची मागणी केली.

साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी महाराष्ट्रात मराठीचीच सक्ती असावी, हिंदी सक्ती कायमची रद्द करावी अशी मागणी केली. यानंतर चार तास चालेल्या कविसंमेलनात महाराष्ट्रातील विविध भागातील कवींनी आपली प्रतिभा दर्शवित उत्तमोत्तम कविता सादर केल्या. कविसंमेलनाचे अध्यक्ष वाईचे ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर होते.

संमेलनाच्या तिसऱ्या दिवशी आज कथाकथन, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवयित्री अनुराधा पाटील यांच्याशी संवाद, अमोल पालेकर यांच्या ऐवज या पुस्तकावर पुस्तक चर्चा होणार आहे. मराठी समाजाची विचारभ्रष्टता, मराठी साहित्यात भयकथा, स्त्री चळवळीची 50 वर्षे, अभिजात दर्जानंतरची मराठी आदी विषयांवर मान्यवरांच्या परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जेष्ठ लेखक, प्रकाशकांचे सत्कार होणार आहेत.

**<u>भारत जागतिक ओळख</u>**

जगभरात सध्या अनिश्चिततेचं वातावरण असूनही, भारताची विकासाच्या वाटेवरील वाटचाल अत्यंत आत्मविश्वासानं सुरू आहे. 2025 या वर्षात जगभरात भारताची ही प्रतिमा आणखी उंचवली आहे. 'सुधारणांचं वर्ष' या विशेष मालिकेत आज, जागतिक स्तरावर भारताची नव्यानं निर्माण होत असलेली ही ओळख, या विषयी ऐकूया माझ्या सहकारी संध्या खान यांच्याकडून....

**जागतिक आर्थिक संस्था, बहुपक्षीय मंच आणि आंतरराष्ट्रीय माध्यमं आता भारताकडे; ठाम निर्णय घेणारा, दीर्घकालीन नियोजन करून त्याची अंमलबजावणी करणारा देश, म्हणून पाहत आहेत. भारत हा जगातला सर्वाधिक सामाजिक समता असलेला देश असल्याचं जागतिक बँकेनं म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने देखील भारतातील सामाजिक सुरक्षा व्यवस्थेतील ऐतिहासिक सुधारणांची दखल घेतली आहे. आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थांनी भारताच्या पत मानांकनात सुधारणा केली आहे. यामुळे जागतिक गुंतवणूकदारांमध्ये**

**भारताची विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या यूपीआय प्रणालीला जगातील सर्वात मोठी रिअल-टाइम पेमेंट प्रणाली म्हणून मान्यता दिली आहे. गेल्या दहा वर्षांत भारताने 17 कोटी 10 लाखांहून अधिक लोकांना गरिबीतून मुक्त केल्याबद्दल जागतिक बँकेने भारताचं कौतुक केलं आहे. मॉर्निंग कन्सल्ट या अमेरिकेतील डेटा विश्लेषण संस्थेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जगातील सर्वाधिक लोकप्रिय लोकशाही नेते म्हणून घोषित केलं आहे. दीपावली या सणाला युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत स्थान मिळालं; तसंच मराठा साम्राज्याशी संबंधित 12 गड-किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आलं. एकंदरीतच 2025 या वर्षात जागतिक पातळीवर भारताची नवी प्रतिमा निर्माण झाली; त्याचबरोबर भारताचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक पातळीवर अधिक ठळकपणे अधोरेखित झाला आहे.**

**अर्जमागे**

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत काल संपली. निवडणूक चिन्हांचं वाटप आज झाल्यानंतर, अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. येत्या 15 जानेवारीला मतदान तर 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. काल अनेक प्रभागांमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले तर अनेक ठिकाणी बंडखोरी कायम राहिली आहे. सर्वच राजकीय पक्षात बंडखोरी झाली, त्याचा फटका बसू नये म्हणून अर्ज मागं घेण्यासाठी बंडखोरांची समजूत काढल्यानंतर बंडखोरांनी अर्ज मागे घेतले. परिणामी काही उमेदवार बिनविरोध निवडले गेले आहेत.

**ऊस उत्पादन**

देशात यंदा सुमारे साडेतीनशे लाख टन साखरेचं उत्पादन होण्याचा अंदाज असून 31 डिसेंबरअखेर 118 लाख टन साखर तयार झाली आहे. त्यात महाराष्ट्रात सर्वाधिक सुमारे 49 लाख टन आणि त्यानंतर उत्तर प्रदेशात 35 लाख टन साखर तयार झाली आहे. देशात आतापर्यंत झालेलं साखर उत्पादन समाधानकारक असून यापुढील काळात त्यात आणखी वाढ होईल अशी माहिती राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

**पुरस्कार**

विज्ञान परिषदेच्या वतीनं दिले जाणारे जीवनगौरव पुरस्कार काल जाहीर झाले. क्षेपणास्त्र क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या डॉक्टर टेस्सी थॉमस यांना डॉक्टर अनिल काकोडकर जीवनगौरव पुरस्कार तर डॉक्टर रा. वी. साठे जीवनगौरव पुरस्कारासाठी लस संशोधक डॉक्टर गगनदीप कांग यांची निवड झाली आहे. प्रत्येकी 2 लाख 51 हजार रुपये, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असं पुरस्काराचं स्वरूप आहे. मुंबईत आज पुरस्कार प्रदान होतील.

**बुलेट ट्रेन**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या दूरस्थ उपस्थितीत मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी राज्यातील दुसऱ्या बोगद्याचा ब्रेकथ्रू कार्यक्रम पार पडला. पालघर जिल्ह्यातला हा दीड किलोमीटर लांबीचा बोगदा विरार ते बोईसर स्थानकांदरम्यान आहे. पहिला बोगदा ठाणे ते बीकेसी दरम्यान असून तो 5 किलोमीटर लांबीचा आहे. 508 किलोमीटर लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचा पहिला टप्पा पुढील वर्षी 15 ऑगस्टला सुरु होण्याची अपेक्षा आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं, सूर्यप्रकाशयुक्त राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**